राज्य योजना सन २०१७-१८
वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना या योजनेचा
(२४०६-२२३२) चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०५.१७/प्र.क्र. १५१/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २२ मार्च, २०१८.

वाचा-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०५.१७/प्र.क्र.१५१ /फ-१, दिनांक ३१.०५.२०१७.
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०५.१७/प्र.क्र.१५१ /फ-१, दिनांक २७.०६.२०१७.
४. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, कमांक :-अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७.
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०५.१७/प्र.क्र.१५१ /फ-१, दिनांक ०७.०८.२०१७.
६. महसूल व वन विभाग,शासन निर्णय,क्रमांक :-डब्ल्यूएलपी-०५.१७/प्र.क्र.१५१/भाग-१/फ-१, दिनांक ०३.१०.२०१७.
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-वजी/ २२(६)/ यो/ प्र.क्र. २४/१९६७/१७-१८, दिनांक २५.०९.२०१७.
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३२/(१७-१८)/१२९४, दिनांक :- ०६.१०.२०१७.
९. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८.
१०. महसूल व वन विभाग,शासन निर्णय,क्रमांक :-डब्ल्यूएलपी-०५.१७/प्र.क्र.१५१/भाग-१/फ-१, दिनांक ०३.१०.२०१७.
११. महसूल व वन विभाग शासन पत्र क्रमांक :- बीयूडी-२०१८/२४०६/प्र.क्र.३१/ब-१, दिनांक १२.०३.२०१८

प्रस्तावना :-

सन २०१७-१८ राज्यस्तरीय योजनेतंर्गत वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या लेखाशिर्षातंर्गत रुपये २००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. वित्त विभागाने संदर्भ क्रमांक १, ४ व ९ च्या परिपत्रकानुसार सन २०१७-१८ मधील निधी वितरणाबाबत निर्गिमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांन्वये संदर्भ क्रमांक २, ३, ५, ६ व १० शासन निर्णयान्वये वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या योजनांतर्गत आतापर्यत रु. १६०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

३. संदर्भ क्रमांक ११ च्या पत्रान्वये वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या योजनांतर्गत सुधारी अंदाजपत्रकामध्ये रु. १८४.०० लक्ष निधी वितरीत करण्यास संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यास (विभागा प्रमुखास) प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

४. सुधारी अंदाजपत्रकामेध्य उपरोक्त योजनांतर्गत रु. १८४.०० लक्ष वजा आपर्यत वितरीत करण्यात आलेला निधी रु. १६०.०० लक्ष सबब वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या योजनांतर्गत रु. २४.०० लक्ष निधी वितरीत करण्यास हरकत नाही.

शासन निर्णय :-

सदर शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ करीता वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या योजने अंतर्गत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ८ च्या पत्रान्वये शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावापैकी संदर्भ क्रमांक क्रमांक ११ च्या शासन पत्रानुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावातील गडचिरोली (प्रादेशिक) यांचे प्रस्तावात नमुद कार्यबाबीवरच **रु. २४.०० लक्ष** निधी खालील अटींच्या अधीन राहून खर्च करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. सदर योजनेवर होणारा खर्च सन २०१७-१८ मध्ये लेखा शिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव, पंचवार्षिक योजनाअंतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना (००) (१०) वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

II. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

III. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

IV. प्रस्तावित असलेल्या मोठ्या बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधित जबाबदारी नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.

V. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

VI. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक :- १७.०४.२०१५, क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७, कमांक :-अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७, क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८ व महसूल व वन विभाग शासन पत्र क्रमांक :- बीयूडी-२०१८/२४०६/प्र.क्र.३१/ब-१, दिनांक १२.०३.२०१८ चे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय महसूल व वन विभाग शासन पत्र क्रमांक :- बीयूडी-२०१८/२४०६/प्र.क्र.३१/ब-१ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१५४४१४९३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.03.22 15:46:24 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नगापूर.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली.
६. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
७. फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****